**रात्र**

निजलेल्या अंबराचे
स्वप्नी गोड हासणे
हसण्यातून सांडलेले
तेच धुंद चांदणे ।

खुललेल्या चांदण्यात
एक मेघ गुंतला
भुलण्यातून हरवला
श्वेत रंग आपुला ।

निळाईची पायवाट
सर्द-गर्द गारवा
नकळताच उमलला
तृप्त मंद चांदवा ।

सुप्त सुस्त धुक्यातही
दाही दिशा लाजल्या
क्षितिजावर पुसटशा
हालचाली जागल्या ।

गंधवेडी रातराणी
मौन साक्षी चांदणी
अधीरपणे फुललेली
स्वप्न रात्र अंगणी ।

**---संध्या रानडे**